# कोकणातील शिमगा: लोकविधी व लोकनाट्य

**संदिप जोतिराम भुयेकर,** संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रास्ताविक :**

भारताच्या पश्चिम किनारपट्टीचा सुमारे ७५० किलोमीटर लांबीचा हिस्सा कोकण म्हणून ओळखला जातो. पश्चिम घाटाच्या पर्वतरांगांनी कोकणाला मैदानी प्रदेशापासून वेगळे केले आहे. पश्चिम घाटाच्या पट्ट्यालाच महाराष्ट्रात सहयाद्री पर्वतरांगा म्हणतात. दक्षिणेस कर्नाटक-गोव्यापासून उत्तरेस दमण पर्यंतच्या किनारी पट्ट्याचा समावेश कोकणामध्ये होतो. कर्नाटकात या भूप्रदेशास कारवली असे म्हणतात. गोव्यात गोमंतक तर महाराष्ट्रात कोकण असेच नाव या भूप्रदेशास प्रचलित आहे. महाराष्ट्रीयन कोकणवासियांनी आपली विशिष्ट अशी संस्कृती जोपासली आहे. मोठ्या प्रमाणावर साजरे केले जाणारे गणपती उत्सव व शिमगोत्सव हे कोकणी संस्कृतीच्या संपन्नतेचे निदर्शक आहेत. यापैकी शिमगा या लोकोत्सवाचा उहापोह प्रस्तुत निबंधात केला आहे. कोकणात शिमग्याला 'शिगमो', 'शिमगो' किंवा 'होळी' या नावाने देखील ओळखले जाते. उदरनिर्वाहासाठी निरनिराळ्या शहरात गेलेले चाकरमानी या निमित्ताने आपल्या मूळ गावी परततात. पारंपरिक रूढी, विधिनिषेध, संकेत आणि गावाविषयीची मनात असणारी ओढ यामुळे ते गावाकडे येतात. स्त्री-पुरूष पारंपारिक वेशभुषेत सजतात. शिमग्याच्या या सणात कोकणातल्या खेडोपाडी सांस्कृतिक संपन्नतेचे एक वेगळेच विश्व आकाराला येते. यातूनच शिमग्याविषयीचे मौखिक लोकसाहित्य नव्या पिढीसमोर येते. लोकसाहित्याची व्याख्या स्पष्ट करताना डॉ. प्रभाकर मांडे लिहीतात, 'परंपरागत लोकजीवनाचा शब्दबद्ध अविष्कार म्हणजे लोकसाहित्य वा लोकवाङ्मय. लोकवाङ्मय मौखिक किंवा अलिखित स्वरूपात एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत येते. त्यातून लोकांच्या सांस्कृतिक जीवनाची अखंड परंपरा व्यक्त होते. लोकवाङ्मयाच्या या प्रवाहामुळे लोकजीवन घडविले जाते त्याला आकार दिला जातो व त्याचे पोषणही होते.'[१]

लोकसाहित्य हे व्यक्तिनिर्मित नसते. सामूहिक मनाचा अविष्कार लोकसाहित्यातून प्रकट होत असतो. समाजाच्या व काळाच्या परिवर्तनानुसार लोकसाहित्यात परिवर्तने होत असतात. लोकसाहित्य हा लोकप्रतिभेचा अविष्कार असल्याने त्यातून लोकसंस्कृती प्रतिबिंबित होते. लोकसाहित्याच्या संदर्भात कोकणातील शिमगा या लोकोत्सवाचा लोकविधी व या अनुषंगाने येणारी लोकगीते हा निबंधाचा विषय आहे.

**लोकविधी**

कोकणातील शिमगा हा एक प्रमुख लोकविधी आहे. फाल्गुन पौर्णिमा हा या लोकविधीचा प्रमुख दिवस असतो. तथापि आठवडाभर कोकणातले लोक या उत्सवात सहभागी होवून आनंद साजरा करत असतात. रत्नागिरी जिल्हयात राजापूर तालुक्यातील पडवे हे गाव शिमगोत्सवासाठी विशेष प्रसिद्ध आहे. क्षेत्र अभ्यासाकरीता या गावातील लोकविधिचे व लोकनाट्याचे वर्णन केले आहे. नवलादेवी ही या गावची ग्रामदेवता आहे.चार वाड्यांचे मिळून हे गाव बनले आहे. लोकांच्या आडनावावरून या वाड्यांचे नामकरण झालेले आढळते. टुकरूलवाडी, तांबेवाडी, जोशीवाडी, अवसरेवाडी या वाड्या मिळून पडवे गाव बनते. फाल्गुन पौर्णिमेच्या रात्री चार वाड्यांचे लोक ग्रामदेवता नवला देवीच्या देवळात जमतात. खोत आणि गावकर हे होळीचे मानकरी असतात. गावकर म्हणजे सामान्यत: गावचे प्रमुख होत. पहाटे अडीच-तीन वाजता देवीच्या मंदिरातील गुरव ज्यांना रहाटीचे गुरव असे संबोधले जाते ते खोतांना साद किंवा हळी देतात. हेल काढून साद घालण्याची ही एक विशिष्ट पद्धत असते. उदाहरणार्थ, 'ओ भाऊ खोत होळीला चला ऽ' अशी साद तीन वेळा घातली जाते. खरे पाहता हे खोत होळीसाठी तयार असतात परंतु साद घालण्याचा पारंपरिक विधि पूर्ण झाल्यानंतरच चार-पाच जणांचा खोतांचा जथ्था मंदिरापाशी येतो.

होळी म्हणजे कुठल्याही जातीचे एक अख्खे झाडच असते. कोकणात वेगवेगळ्या गावात वेगवेगळ्या झाडांचा वापर होळी म्हणून केला जातो. काही गावांत ही होळी आंब्याची असते, माडाची असते तर काही गावांत अगदी काटेसावरीची देखील असते. अप्रत्यक्षरित्या जो वृक्ष त्या प्रदेशात विपुल असेल तिथे त्या वृक्षाची होळी असते. घाटाच्या अगदी खाली काटेसावरीची होळी असते.हाथिवले-पडवे परिसरामध्ये आंब्याची होळी असते तर

अगदी समुद्र किनारी जैतापूर परिसरामध्ये नारळाची होळी असते. एकाच प्रकारच्या वृक्षाची होळीसाठी सर्वदूर कत्तल होऊ नये हा यामागचा संकेत असावा. साधारणपणे सरळसोट वाढलेले चाळीस-बेचाळीस हात उंचीचे झाड लोकांनी आधीच हेरून ठेवलेले असते. मंदिरात धूपारती करून सगळे गावकरी होळी तोडावयास जातात. पहाटे चार वाजेपर्यंत होळीचा खोड खळ्यात आणून उभा करतात. होळीला पानाफुलांनी सजवतात. होळीच्या वरती नारळ बांधतात. सभोवताली गवत रचून आग पेटवतात. ढोल-झांज ही पारंपरिक वादये तालात वाजवतात. आग विझल्यानंतर कोणीतरी चढून नारळ काढतात. नारळ काढल्यानंतर पुन्हा होळी पेटवतात. होळीची पूजा करून कोकणी पद्धतीने देवाला गाऱ्हाणे किंवा साकडे घालतात. हे गाऱ्हाणे मुख्यत: गावाच्या रखवालीसाठी असते. याप्रसंगी काही भाविक होळीसमक्ष नवसही बोलतात. साधारणपणे पहाटे पाच वाजता होळी शेजारच्या ओहळावर सगळे गावकरी आंघोळीस जातात. नारळ फोडून खिरापत करतात. आंघोळीनंतर होळीचा लोकविधि समाप्त होतो व लोकनाट्यास प्रारंभ होतो.

**लोकनाट्य**

होळीच्या उत्सवात आठवडाभर चालणाऱ्या लोकनृत्य व लोकगीतांच्या सादरीकरणाला 'कापडखेळे' असे म्हणतात. तारा भवाळकर यांच्या मते, 'दशावतार, नमन, खेळे हे कोकण-गोमंतकातील नाट्य प्रकार लोकनाट्य व विधिनाट्य यांच्या सीमारेषेवर रेंगाळणारे नाट्य प्रकार आहेत.''[२] पडवे गावचे प्रसिद्ध असणारे कापडखेळे हे मात्र लोकनाट्याकडेच जास्त झुकणारे आहेत. कापडखेळे हे पारंपरिक मनोरंजनाचे धार्मिकतेचे वलय असणारे लोकनाट्य आहे. आंघोळीनंतर काही ठराविक गावकरी होळीच्या खेळ्यासाठी पारंपरिक वेशभूषा परिधान करतात. अशी वेशभूषा परिधान करणाऱ्या किमान पाच तरी पुरूषांच्या जोड्या असतात. खेळ्यांच्या पवित्रतेचे पालन करण्यासाठी या लोकांनी उत्सव कालावधीत शाकाहारी राहावे असा लोकसंकेत प्रचलित आहे. खेळे खेळणाऱ्या लोकांची वेशभुषा वैशिष्ट्यपूर्ण असते. ही वस्त्रे गावातील लोकांनी नवसाला वाहिलेल्या कपड्यांपासून बनविलेली असतात. खेळ्यांच्या डोक्याला विशिष्ट प्रकारचे फेटे बांधलेले असतात. फेट्यांवर मागेपुढे डोलणारे गोंडे लावलेले असतात.पुढच्या बाजुला तुरे लावलेले असतात. अंगात ढगळ शर्ट घातलेले असतात व त्यावर दंडाखालून व खांदयावरून चौरस केलेले नक्षीदार शेले बांधलेले असतात. कमरेखाली पांढऱ्या रंगाचे पंजी कासोटा बांधुन नेसलेले असते त्यावर रंगीबेरंगी साड्या घड्या करून पोतराजासारख्या बांधलेल्या असतात.खेळ्यांच्या गळ्यात काळ्या मण्यांची डोरली बांधलेली असतात. ग्रामदेवता नवलादेवीचा हा सौभाग्यअलंकार परिधान केल्याचे जाणकार सांगतात. खेळ्यांच्या एका हातात टिपरी व दुसऱ्या हातात मोरपिसांचा गुच्छ असतो. एका खेळ्याच्या पाठीवर लाल वस्त्रात नारळ बांधून ठेवलेला असतो. याला देव बांधला आहे असे म्हणतात. हा देव बांधण्याचा मान ही परंपरागतरित्या विशिष्ट घराण्यात असतो. उत्सवानंतर सगळे साहित्य जतन करून ठेवण्याची जबाबदारी खोतांवर असते. चंदन किंवा शिसव यापासून बनवलेल्या पाच काठ्यांवर देवांची निशाणे सजवलेली असतात. ही निशाणे म्हणजे देवच असे लोक समजतात. भोसल्यांच्या घरी हा मान असतो.वाड्यांवर फिरताना या निशाणांच्या मिरवणुका काढतात. मुस्लिम समाजातील ताबूत मिरवणूक किंवा ताबूत भेटीसाठी निघणे अशाच प्रकारचा हा विधी असतो.

प्रत्यक्ष होळीनंतरच्या पहिल्या दिवशी सकाळी साधारणपणे नऊ वाजता सर्व खेळे व गावकरी मांडावर येतात. मांड म्हणजे शेणाने स्वच्छ सारवलेले, वस्त्र-फुलांनी सजवलेले चौरसाकृती अंगण असते. प्रत्येक वाडीवर विशिष्ट ठिकाणी असे मांड असतातच. मांडाच्या मध्यभागी एक खांब असतो. या खांबावर समयी पेटत ठेवलेली असते. मांडाच्या वर चांगले वस्त्र लावलेले असते.पावित्र्यासाठी मांडाच्या वरच्या बाजूला कलात्मकरित्या आंब्याचे डहाळे सजवलेले असतात. मांडाच्या अंगणात चुन्याने नक्षीकाम केलेले असते.ही नक्षी मांगल्य सूचक असते. खेळ्याची गाणी म्हणणारे आणि वादय वाजवणारे लोक मध्यभागी असतात. या लोकांच्या डोक्यास गांधी टोपी, अंगात फूल शर्ट व कमरेखाली पंचा असतो. खेळ्यांना गीतकाव्य आणि वादयसंगीताची साथ देण्याचे महत्त्वाचे कार्य हा जथ्था करीत असतो. या लोकांच्या बाहेरच्या बाजूला गोल रिंगण करून खेळ्यांचे वस्त्र परिधान केलेले पुरूष विशिष्ट लकबीत मागे पुढे होऊन जोड्या बनवून नृत्य करीत असतात. घाटावरील लेझीम नृत्यासारख्या या नृत्याच्या काही चाली असतात तर काही चाली या जाखडी नृत्यासारख्या असतात. गाणी म्हणत

असताना खेळे विशिष्ट लकबीत जोडीदाराशी टिपरी खेळतात. ही टिपरी खेळत असताना दुसऱ्या हातातील मोरपिसांचा गुच्छ सैलसर हलतो. खेळ्यांचे रंगारंग पोशाख, फेट्यावरील तुरे, हलणारे गोंडे, टिपरीचा ध्वनी व मोरपीसांची सततची हालचाल यामुळे खेळ्यांच्या लोकनृत्याचे दृश्य अतिशय विलोभनीय असे दिसते. गावकरी प्रेक्षक खेळ्यांच्या या नाट्यामध्ये रात्र रात्रभर रंगून जातात.

शिमगोत्सवाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे खेळे खेळणारे आणि त्यासंबंधीत असणारे सगळे लोककलावंत होळीनंतर परंपरेनुसार गावाबाहेर एक वस्ती करतात. इच्छूक लोक खेळ्याची कपडे घेवून निघतात व दुसऱ्या गावच्या मांडावर राहून एक रात्र राहतात. हा एक प्रकारे सिमोल्लंघनाचा विधि असतो. दुसऱ्या गावचे गावकरी ही या पाहुण्यांचे स्वागत करून त्यांचा आदर सत्कार करतात.दुसऱ्या दिवशी खेळे पुन्हा आपल्या गावात येतात.खेळ्यांच्या स्वागतासाठी सारा गाव सजतो.हातात सजलेली ताटे घेऊन कुमारीका मुली खेळ्यांच्या निशाणांचे आणि खेळेकऱ्यांचे औक्षण करतात. चांगलेचुंगले कपडे घालून अख्खा गावच खेळ्यांना सामोरा जातो. ढोल ताशांच्या गजरात त्यांचे स्वागत होते. ‘आज आपल्याकडे देव इले’ या भावनेनेच लोक प्रसन्न होतात. यानंतरचे पाच–सहा दिवस खेळेकरी घरोघरी देवतांचे निशाण घेऊन त्या ठिकाणी लोकगीते गाऊन नाचतात. लोक मनोभावे त्यांची पूजा करतात शिमग्याच्या या लोकगीतांना ‘जती’ असे म्हणतात. लोकगीताची व्याख्या करताना वि. का. राजवाडे म्हणतात, ‘अमूक एका व्यक्तीची कारागिरी त्याच्यात दिसणे शक्य नसते. लोकगीते, उत्सव प्रसंगी भक्तिभावाने तल्लीनता प्राप्त झाली असता व सामाजिक मन एकतान झाले असता निर्माण होतात, अर्थात कोणत्याही एका व्यक्तीला अशा गीतांवर हक्क सांगता येत नाही.’[३]

‘जती’ म्हणजे शिमगोत्सवात म्हणावयाची पारंपरिक लोकगीते. ज्याप्रमाणे जात्यावर बसल्याशिवाय स्त्रियांना ओवी सूचत नाही. त्याचप्रमाणे खेळ्यांची वेशभूषा परिधान करून प्रत्यक्ष मांडावर डफ, मृदंग, झांज वाजत नाही तोपर्यंत ही लोकगीते निद्रीतावस्थेत असतात. एकदा का ही वातावरण निर्मिती झाली की पुरूषांनी म्हणावयाची ही लोकगीते लागोपाठ स्फुरत जातात व रात्ररात्रभर चालतात. खास होळीसाठी सजवलेल्या मांडावर रात्री जेवणानंतर हे नाट्य रंगते. प्रत्येक गीताच्या सुरूवातीला व शेवटी ‘जोय जता हरी जोय जता’ असे पालूपद म्हटले जाते. ‘जय जेता हरी जय जेता’ या मूळ संहितेचा अपभ्रंश बनून ते बनले असावे. जतींची सुरूवात ही गणेश स्मरणानेच होते.उदा.

जोय जता हरी जोय जता ऽ
अर्जुनाच्या कुली निघाली आले आमंत्रण
पांडवांचे घरी मानीले मोठे अभिमान
पांडवांचे घरी मांडीले मोठे भोजन
चार दिवस तेवढी करावी भोजन कारण
गणेश आमचा देव उभारला कडेस येवून
सौभाग्यानू करू लागला कृष्ण पूजन
राव पावणे जेवा म्हणता गातो कवन
राव पावणा गणेश आला घराच्या बाहेर
एक दिवस गणेश राहावा घरात माझ्या वस्तीला ऽ
जोय जता हरी जोय जता ऽ

अशा प्रकारे महाभारतातील संदर्भातून गणेश स्मरण केले जाते. जतीच्या प्रत्येक गीतामागे रामायण–महाभारत व पुराणांचे संदर्भ असतात. रामायणातील श्रावण बाळाची कथा मालागीताच्या रूपात गायली जाते. ती अशाप्रकारे–

रात्रीच्या वेळी मार्गी चालला
मात्या पित्याची कावड खांदयाला
ऽ कावड खांदयाला
तहान लागली त्येच्या पित्याला
माता ती बोले श्रावण बाळाला
तहान लागली तुझ्या पित्याला
कावड ठेविली वृक्ष फांदीला
पाणी आणायला तो तळ्याशी गेला
दशरथ राजा बसला शिकारीला
घागर पाण्याशी बुडवताना आवाज आला
दशरथ राजाने बाण सोडला
ऽ बाण सोडला ऽ
हदयी बसता बाण श्रावण धरणी पडला ऽ
जोय जता हरी जोय जता ऽ

जतीमधून पुराणातील काही मिथके ही समोर येतात.महासागरात विष्णू शेषाच्या मंचकावर पहुडलेला आहे. या शेषाच्या मस्तकावर पृथ्वी तरली आहे असा सामान्य मिथकाचा विषय नाट्यमय पद्धतीने खेळ्यांच्या नाचात समोर येतो.

नाच कशावरी गं ऽ
नाच भूमीवरी गं ऽ
भूमी कशावरी गं ऽ
भूमी शेषावरी गं ऽ
शेष कशावरी गं ऽ
शेष मंडळावरी गं ऽ
मंडळ कशावरी गं ऽ
मंडळ नीरू वरी गं ऽ

शंकर–पार्वतीच्या सारीपाटाचा खेळ चालला असता शंकराला तहान लागते. परंतु पार्वती पाणी आणून देत नाही. पार्वतीचे गर्वहरण करण्याच्या हेतूने शंकर झारीतून पाणी काढतात. अशी गोष्ट एका जतीत येते.

जोय जता हरी जोय जता ऽ
महादेव पार्वती होते बसले आनंदात
हार जीतीचा डाव मांडूनी होती खेळत
महादेवाला तहान लागली घागर हातात
महादेवाला पाणी न देता झारी हातात
तेव्हा पार्वती निघून गेली आपल्या महालात
महादेवाने खूण ओळखली हसला मनात
पार्वतीला गर्व झाला इश्वर भगवंत
महादेवाने पाणी उडवले आकाशाचे वरतं
त्या पाण्याच्या धारा उडवल्या पार्वती वरतं
पार्वतीचा गर्व हरविला दोन क्षणात ऽ

अशा प्रकारे सामान्य घटनांना गीतरूप देवून गायले जाते. या गीतामध्ये मग भक्ती संप्रदायातील संतांचाही उल्लेख येतो. ‘कार्तिक मासी एकादशी संत मिळून जाई ऽ आमच्या घराकडे चला विठोबा म्हणे जनाबाई ऽ.’

कोकणातले बहुतांश वारकरी हे कार्तिक वारीला विठोबाला येतात. आषाढी वारीच्या वेळी त्यांची शेतकामाची लगबग असते. जतीमध्ये काही कूट प्रश्नही विचारले जातात व या कूट प्रश्नांची उत्तरे न देता प्रेक्षकांची उत्सुकता ताणून ठेवली जाते. काही जतीमध्ये तर विरह गीतेही येतात. मला आढळलेले एक विरह गीत असे–

कसं केलस रे भगवाना श्रीरामा
मंदिरी झोप लागना रे ऽ
मी सय वर्षाची लहान काय लहान
सदनाशी लाविले लग्न रे ऽ
असा सजन गेला टाकूनी टाकूनी
हळदीचा डाग लावूनी रे ऽ
बारा वर्षे झाली लग्नाला लग्नाला
हळदीचा डाग जाईना रे ऽ
मी नवस केला देवाला देवाला
या दूरच्या जोतिबाला रे ऽ
असा देव मला पावला पावला

हा सजन घराशी आला रे ऽ

या गाण्यातील मुलीचे लहानपणीच लग्न झाले आहे. हळदीचा पार पडलेला विधि आठवत ती दिवस कंठत आहे. बारा वर्षे झाली तरी तिचा नवरा तिला भेटत नाही. म्हणून ती जोतिबाला नवस करते व तो तिला प्राप्त होतो असा सकारात्मक शेवट या गीतातून केला आहे.

दोन जतीच्या सादरीकरणाच्या दरम्यान अफलातून सोंगे आणून लोकांचे मनोरंजन करण्याची प्रथा या खेळ्यांमध्ये आढळते.सोंगे आणणारे कलाकार हे प्रेक्षकांमध्येच बसलेले सामान्य लोक असतात. ते मध्येच तीन-चारच्या गटाने उठून जातात व आपला चार-पाच मिनिटांचा सोंगाचा कार्यक्रम सादर करतात. ही सोंगे देखील प्रेक्षणीय असतात. यात कल्पना विलासाला भरपूर वाव असतो, चालू काळातील राजकारणावर, समाजकारणावर व ढासळत्या मूल्य व्यवस्थेवर यातून व्यंगात्मक टिप्पणी केलेली असते. काही सोंगांमध्ये अतिशयोक्तीपूर्ण गोष्टी दाखविल्या जातात. उदाहरणार्थ, 'ऐकं रं दादा व्हैक सांगतो' असे म्हणून एक उंचच्या उंच ढगळ विजार बनवून १०-१५ फूट उंचीचा माणूस बनवून आणतात. 'काळी मांजर कुणाची हगते गुणाची' अशा गाण्याच्या चालीवर मांजराचा मुखवटा बनवून माणूस आणला जातो. 'शेंडी मुंडी कधीची जल्माच्या आधीची' असे म्हणून उलट्या सुरीने ती कापण्याच्या प्रयत्न केला जातो पण उलट्या सुरीने ती कापली जात नाही, हे व्यवहारज्ञान ही प्रेक्षकांना दिले जाते. विनोद निर्मिती हे सोंगांचे प्रयोजन असते. जतीच्या दोन गीतांच्या दरम्यान प्रेक्षकांना जागे करण्याचे काम ही सोंगे करत असतात.पुढच्या सोंगातून वेगळे काहीतरी पहायला मिळेल ही उत्कंठा प्रेक्षकांना खिळवून ठेवते. जेव्हा जतीचे एक गाणे चालू असते तेव्हा शेजारच्या एखादया घरात किंवा देवळात गुप्तपणे पुढच्या सोंगाला नटवले जाते. जती संपताच अनाहूतपणे हे पात्र मांडावर येते. अचानक हे पात्र कुठून आले? असा प्रश्न पडून प्रेक्षक अचंबित होतो. जतींची भाषा ही प्रमाण मराठीच्या जवळची असते तर सोंगांचे सादरीकरण मात्र राजापुरी बोलीतूनच केले जाते.

**समारोप :**

कोकणाला एक विशिष्ट अशी लोकसंस्कृती आहे. गणपती उत्सव आणि शिमगोत्सव हे कोकणचे प्रमुख उत्सव आहेत. फाल्गुन पौर्णिमेच्या रात्री होळी तोडणे व ती पेटवण्याचे विधिनाट्य घडते. पारंपरिक लोकसंकेत या विधिनाट्याला नियंत्रित करीत असतात. शिमगोत्सवाच्या काळात पुरूषांनी टिपरी नृत्य करीत म्हणावयाची लोकगीते म्हणजे 'जती' होत. या लोकनृत्याला खेळे असे म्हणतात. जतींचे विषय हे सामान्यत: पौराणिक असतात. जतींमध्ये कूटप्रश्न, विरहगीते, देवदेवतांना आवाहन इत्यादी विषयही येतात. क्षेत्र अभ्यास म्हणून निवडलेल्या राजापूर तालुक्यातील पडवे गावचे खेळे हे वैशिष्ट्यपूर्ण वेशभुषेमुळे 'कापडखेळे' म्हणून प्रसिद्ध आहेत. खेळ्यांमध्ये मधे-मधे सादर केल्या जाणाऱ्या सोंगांमुळे त्यांना लोकनाट्याचे स्वरूप प्राप्त होते.कापडखेळे हा कोकणी संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे.आभासी तंत्रज्ञानाच्या सध्याच्या काळात या प्रयोगात्मक लोककलेचे जतन होणे गरजेचे आहे.

**संदर्भ:**

१. राजाध्यक्ष विजया (संपा.)- मराठी वाङ्मय कोश, खंड चौथा, समीक्षा- संज्ञा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २००२,पृष्ठ ३०४.
२. तत्रैव, पृष्ठ ३०२.
३. मांडे प्रभाकर- लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पाचवी आवृत्ती, २००९, पृष्ठ २२८.
४. कापडखेळे कलावंत श्री. संतोष तांबे यांची प्रत्यक्ष मुलाखत.